**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## शैक्षणिक सत्र २०२१-२२ करीता महाविद्यालय प्रवेश अंतिम तिथीबाबत विद्यार्थ्यांना सूचना

## ३० ऑक्टोबर पर्यंत प्रवेशाची अंतीम तिथी

## विद्यार्थी हितासाठी कुलगुरूंचा महत्वपूर्ण निर्णय

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सर्व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२१-२२ करीता प्रवेश देण्याची अंतिम तिथी दि. १८ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत कळविण्यात आली होती. परंतू, कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे विलंबाने लागलेले निकाल व त्यामुळे विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये व कुठलाही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, याकरीता विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी आपल्या अधिकारांतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी अंतिम तिथीत वाढ केली असून ती आता दि. ३० ऑक्टोबर, २०२१ करण्यात आली आहे. यानंतर कुठल्याही परिस्थितीत अंतीम तिथीत वाढ केल्या जाणार नाही, याची सुद्धा नोंद विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांनी घ्यावयाची आहे.

तरी सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. २०/१०/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी